Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue – LXXIII

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 500/-

| | | | |
|---|---|---|---|
| 91 | उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी येणाऱ्या अडचणी व उपाय | नासीर गिरासे | 462 |
| 92 | मौखिक इतिहास | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 465 |
| 93 | आदिवासी कोकणा भाषेचा एक शोध | प्रा. जयश्री रामदास बाबुळ (खरे) | 472 |
| 94 | सावरकरांचा राष्ट्रवाद | प्रा. संतोष शेलार | 477 |
| 95 | बाबुराव बागुलांच्या कवितेतील विविध जाणीवा | डॉ.देविदास बोडेवाड | 489 |
| 96 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनातून अभिव्यक्त होणारा स्त्रीविषयक दृष्टीकोन | डॉ.दादाराव गुंडरे | 495 |
| 97 | प्रशासकीय सुधारणा आणि तंत्र | प्रा.हनमंत हेळवे | 500 |
| 98 | शौचालय व सामाजिक परिवर्तन | प्रा.आर. बी.काळे | 504 |
| 99 | नांदेड जिल्ह्यातील शेतीवर आधारित उद्योगधंदे : एक भौगोलिक अभ्यास | डॉ.यु.एस.कानवटे | 508 |
| 100 | आपत्ती व्यवस्थापन व प्रसार माध्यमे | डॉ. बालासाहेब मुंडे | 512 |
| 101 | दलित कवितेतील आई | प्रा.विलास पंडित | 516 |
| 102 | राजकारण व महिलांचे सक्षमीकरण – एक अभ्यास | विनोद ढोले | 520 |
| 103 | जतन व संरक्षण : इफला (IFLA) चे योगदान | श्री.नारायण फड | 524 |
| 104 | बारोमास-होरपळून निघणाऱ्या कृषिकेंद्रित जीवनाची करुण गाथा | डॉ.शकुंतला भारंबे | 529 |
| 105 | बखरकारांनी रेखाटलेली संभाजी राजांची अनैतिहासिक प्रतिमा | डॉ.डी.एस.बिराजदार | 533 |
| 106 | अमळनेर येथील प्रताप हायस्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी यांचा भारतीय स्वतंत्र आंदोलनातील सहभागाचा इतिहास-एक अभ्यास | प्रा.किशोर पाटील | 537 |
| 107 | १९९० नंतरच्या प्रसिद्ध लेखकांच्या पत्नीचे आत्मचरित्रे | डॉ.एस.पी.पैकेकरी | 540 |
| 108 | संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य | डॉ. सदाशिव सरकटे | 544 |
| 109 | वाचनसंस्कृती – दिशा आणि दशा | डॉ. प्रतापराव गायकवाड | 548 |
| 110 | वृद्धांच्या समस्या – एक समाजशास्त्रीय चिंतन | प्रा. प्रदीप पाटील | 554 |
| 111 | मुस्लीम सत्यशोधक समाजाची वाटचाल (१९६६ ते आजपर्यंत) | प्रा. श्रीचंद चव्हाण | 558 |
| 112 | संत साहित्यमूल्यांचे समकालीन महत्त्व | प्रा. डॉ. धनराज स. खानोरकर | 561 |
| 113 | क्रांतिनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर : काही निरीक्षणे | डॉ. सुरेश खोब्रागडे | 567 |
| 114 | नव्वदोत्तर समाज जीवन आणि स्थित्यंतरे | - डॉ. किशोर सोनवणे व दिनानाथ पाठक | 573 |
| 115 | निसर्गाचे लीलाचरित्र चितारणारी ललित प्रतिभा- मारुती चितमपल्ली | प्रा. सचिन पाटील | 578 |
| 116 | परिवर्तनाच्या लढ्याला गतिमान आणि सशक्त बनविणारे विवेकी चिंतन ! | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 581 |
| 117 | नाशिक जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह चळवळ | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 588 |
| 118 | महाराष्ट्रातील गायकवाडी सिंचन प्रकल्पाचा इतिहास : एक अभ्यास | प्रा. प्रवीण चव्हाण | 594 |
| 119 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | डॉ. महादेव मुंडे | 598 |
| 120 | शोषण करणाऱ्या नव्या व्यवस्थेचा शोध घेणारी अरुण काळे यांची कविता : 'नंतर आलेले लोक' | डॉ. शशिकांत पाटील | 602 |
| 121 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप आणि जनमानस | प्रा. राजाराम झोडगे | 607 |
| 122 | मानसिक तणावात नाडीशुद्ध प्राणायामाचा परिणाम | कुणाल महाजन | 612 |
| 123 | सामाजिक पर्यावरण : काही निरीक्षणे | प्रा.अंबादास पुळे | 616 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 : UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# प्रशासकीय सुधारणा आणि तंत्र.

प्रा.हनमंत बालाजी हेळंबे,
(विभागप्रमुख,लोकप्रशासन)
र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई जि.बीड

**प्रस्तावना :**

प्रशासकीय सुधारणा प्रशासनास लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम, जबाबदार व प्रभावी बनवण्याची एक प्रक्रिया आहे. प्रशासनास गतिमान,नैतिक व नागरिक केंद्रित बणवुन राष्ट्राचा सर्वांगीण विकास घडवुन आणण्यासाठी प्रशासकीय सुधारणा महत्वपुर्ण असते. प्रशासकीय सुधारणा कर्मचारी वर्गाची संतुष्टी व प्रबळ राजकिय इच्छाशक्ती असल्याशिवाय होत नाहीत. कारण प्रशासकीय सुधारणा केवळ संघटनात्मक कामगीरीशी संबंधीत नसुन संपुर्ण सार्वजनिक क्षेत्राची कामगीरी सुधारणाशी संबंधीत आहेत. प्रशासनास बदलत्या परिस्थितीशी सुसंगत बनवण्यासाठी सुधारणा/ परिवर्तनाला प्राधान्य दिले जाते. प्रशासकिय सुधारणेच्या माध्यमातुन शासन-प्रशासन रचना, कार्यपध्दती, प्रशासकीय संघटना,नागरीसेवा यात बदल घडवुन आणताना आधुनिक विचार, नाविन्य, सृजनशिलता, नवनिर्मीतीला स्थान दिले जाते. तसेच प्रशासनास जटिल आव्हानात्मक व नविन कार्य पार पाडण्यास सक्षम बनविणे,कर्मचाऱ्यांच्या मनोबलात सुधारणा घडवुन आणण्याच्या दृष्टीने सुधारणा होतात.

**उद्देश :**

१) प्रशासकीय सुधारणा संकल्पनेचा अभ्यास करणे.
२) प्रशासकीय सुधारणा तंत्राचा आढावा घेणे.

वरिल प्रमाणे प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्देश निश्चित केले आहेत.

**संशोधनपध्दती:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.त्यासाठी संदर्भग्रंथ,अहवाल,मासिके इंटरनेट इ.साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्रशासकिय सुधारणा संकल्पना-**

प्रशासकिय सुधारणा संकल्पनेचा सर्वप्रथम प्रयोग ,फ्रान्स चे जीन रुडोलस पेरोने आलपिन बनवण्याच्या प्रक्रियेत केला  व त्यानंतर अमेरिकन विचारवंत फ्रेडरिक टेलरने शास्त्रीय व्यवस्थापन सिध्दांत मांडला. याचा उद्देश ही प्रशासकिय सुधारणा हा होता. प्रशासकिय सुधारणांची प्रक्रिया विकसित व विकसनशिल अशा सर्व देशांमध्ये पहावयास मिळते. सुधारणा हा प्रशासनाचा अविभाज्य घटक आहे. कारण कोणतीही प्रशासन व्यवस्था अपरिवर्तनिय नसते. बदलती परिस्थिती,जनअपेक्षा व ज्ञानवृध्दीशी अनुरुप प्रशासन व्यवस्थेत बदल/सुधारणा अपेक्षीत असतात. तसेच बदलत्या राजकिय,सामाजिक व आर्थिक परिस्थितीशी अनुरुप प्रशासकिय सुधारणा महत्वपुर्ण ठरतात.दुसऱ्या महायुध्दानंतर जगातील अनेक राष्ट्रांनी विशेषत: विकसित व विकसनशिल राष्ट्रांनी आपले प्रशासन कार्यक्षम व जबाबदार बनविण्यासाठी प्रशासकिय सुधारणेला प्राधान्य दिले. शासनाच्या योजनांची यशस्वीता व लक्ष्यप्राप्तीसाठी प्रशासकिय आवश्यक आहेत.

ISSN : 2348-7143
November-2018

"प्रशासकिय सुधारणा" शब्दप्रयोग प्रशासकिय परिवर्तन व प्रशासकिय पुर्नरचना यासाठी केला जातो. परंतु या शब्दामध्ये थोडे अंतर आहे. सुधारणा म्हणजे विद्यमान व्यवस्थेचे दोष समाप्त करणे होय. पुर्नरचना म्हणजे नविन मागण्यांना केंद्रमानुन वर्तमान व्यवस्थेचे पुर्नगठण करणे तर परिवर्तन म्हणजे वैचारीक,सामाजिक आर्थिक दृष्टीकोनातुन व्यवस्थेचे नवीनीकरण करणे होय.[1]

**गेराल्ड ई केडन यांच्या मते :**

प्रशासकिय सुधारणा अशी प्रक्रिया आहे की,ज्यात प्रशासन व्यवस्थेची कार्यकुशलता व गुणवत्ता वृध्दीसाठी कृत्रिम सुनियोजीत पध्दतीने परिवर्तन केले जाते. प्रशासन व्यवस्थेची कार्यकुशलता,गुणवत्ता व पारदर्शकता या गोष्टी आपोआप सुधारत नाहीत त्यासाठी हेतुपरस्पर सुधारणा घडवुन आणाव्या लागतात.[2]

**प्रो हान बी** - यांच्यामते

"प्रशासकिय सुधारणा म्हणजे राष्ट्र विकासाच्या विधायक ध्येयासाठी प्रस्थापित व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी नव्या कल्पनांच्या समुच्चय जाणिवपुर्वक वापरणे होय."[3] ( Administrative Reform is an effort to apply new ideas or combinations of ideas to an Administrative system for positive goals of national developments by Hann - Bee)

प्रशासकिय सुधारणा हया व्यापक व मर्यादित स्वरुपात घडवुन आणल्या जातात.याची व्युहरचना अगोदरच ठरवावी लागते. काही प्रशासकिय सुधारणा तात्काळ परिणाम साध्य करणाऱ्या तर काही दुरगामी परिणाम साध्य करणाऱ्या असतात.हया प्रशासकिय सुधारणा तीन प्रकारच्या असतात.

**संरचनात्मक सुधारणा** - structural reforms

प्रशासकिय संघटनेच्या/व्यवस्थेच्या संरचनेत परिवर्तनाशी संबंधीत असतात. जसे अधिनस्थ कार्यालय स्थापनेवेळी,प्रशासकिय विकेंद्रिकरण, अधिकार प्रदत्तीकरण,इ. माध्यमातुन हया सुधारणा घडवुन आणल्या जातात.

**प्रक्रियात्मक सुधारणा**- procedural reforms

प्रशासन अथवा प्रशासकिय संघटनेची कार्यप्रणाली,व्यवस्थापन पध्दती, नियम इ. मध्ये या सुधारणा केल्या जातात.या सुधारणा प्रशासनात कार्यप्रक्रिया पध्दती मध्ये परिवर्तन घडवुन आणण्याच्या दृष्टीने केल्या जातात.

**व्यवहारात्मक सुधारणा** -behavioral reforms

आचरण/ वर्तनात्मक सुधारणा म्हणुनही ओळखले जाते.प्रशासकिय संघटनेत कार्यरत कर्मचाऱ्यांची मनोवृत्ती, आचरण, नैतिकता संवेदनशिलता,जनसंपर्क व जबाबदारी संबंधी या सुधारणा आहेत.नागरिकांना लालफितशाही,भ्रष्टाचार यापासुन दिलासा मिळुन मैत्रिपुर्ण कार्य पार पाडले जावेत.हे या सुधारणेत अपेक्षित असते.या सुधारणात सुशासन ,माहिती अधिकार, नागरिक सन, लोकसेवा हमी कायदा इ. चा समावेश होतो.

थोडक्यात प्रशासकिय सुधारणा शिफारशी करताना वरील तिन्ही प्रकार केंद्रबिंदु मानुन शिफारशी कराव्या लागतात.कारण यात समन्वय आवश्यक आहे. प्रशासकिय सुधारणा घडवुन आणताना पुढिल टप्पे महत्वपुर्ण आहेत.

१. प्रशासकिय सुधारणेच्या आवश्यकतेची माहिती / ज्ञान

ISSN : 2348-7143
November-2018

२. लक्ष्य व योजनांचे सुसुत्रीकरण
३. क्रियान्वय
४. मुल्यांकन

वरील टप्प्यांच्या व्यवस्थित अंमलबजावणीतुन सुधारणा घडवुन आणल्या जातात.

**प्रशासकिय सुधारणा तंत्र :**

प्रशासन जबाबदार,उत्तरदायी बनावे.कार्य सुनियोजित पध्दतीने, कमीत कमी खर्चात अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी प्रशासकिय समस्यांचे समाधान आवश्यक असते. यासाठी शासन प्रशासकिय सुधारणेला प्राधान्य देते. प्रशासकिय सुधारणा करताना पुढील महत्वपुर्ण तंत्राचा" अवलंब करण्यात येतो.

**कार्यअभ्यास** - work studay

कार्य अध्ययन हे प्रशासकिय सुधारणेचे महत्वपुर्ण तंत्र आहे. कोणत्याह संघटनेव्दारे केल्या जाणाऱ्या कार्याचे निरिक्षण ,सर्वेक्षण व परिक्षण कार्य अध्ययनाच्या माध्यमातुन करता येते. यात प्रथम पध्दती (methods) चे अध्ययन केले जाते. त्यामुळे संघटना / प्रशासनाच्या प्रचलीत कार्यपध्दतीने कोणत्या उणिवा,आहेत व काय सुधारणा कराव्या लागतील याची माहिती प्राप्त होते. कार्यपध्दतीतील दोष दुर करुन प्रशासनाची कार्यकुशलता वाढवली जाते.कार्य अध्ययनामध्ये कार्याचे मोजमाप ,संगठणात्मक विश्लेषन याचाही आधार घेतला जातो. प्रशासकिय सुधारणेसाठी कार्य अभ्यासाच्या माध्यमातुन जे निष्कर्ष समोर येतात त्याव्दारे संघटनेत सुधारणा करण्यासाठी उपयोग होतो.

**कार्य सरळीकरण / सुलभता** - work simplification

कार्य सरळीकरण/सुलभता यास काही विव्दान संघटना/ व्यवस्थापनाचे हृदय मानतात. यात कार्याची जटिलता कमी करुन सोपे बनवले जाते. कार्य सरळीकरणाचे लक्ष्य कार्य प्रक्रिया अथवा पध्दती सोपी-सरळ करणे हे आहे. प्रशासकिय सुधारणेमध्ये कार्य सोपे-सुलभ करण्याला प्राथमिकता दिली जाते. कार्य समस्याची माहिती,त्याचे विश्लेषण,कार्य समाधानाची एक व्यवस्थित प्रक्रिया म्हणजे कार्य सुलभता होय. म्हणजेच कार्य संचलनातील सर्व जटील मार्ग दुर करुन कार्य करण्याच्या सोप्या मार्गाचा विकास केला जातो. यामुळे वेळ,पैसा याची बचत होऊन उत्पादकता वाढते, कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावते.म्हणुन प्रशासकिय सुधारणाअंतर्गत कार्यसरळीकरण/ सुलभता यास प्राधान्य दिले जाते.

**स्वचालन** - Automation

पारंपारिक प्रशासनाची कार्यपध्दती, आधुनिक कार्य जटिलता यामुळे संघटनाचे कार्य कार्यक्षमतेने यशस्वी होत नव्हते.त्यामुळे कार्याचा बोझ्या वाढत होता. लालफितशाही,कार्यविलंब हे दोष दुर व्हावेत यासाठी स्वयंचलीत उपकरणेप्रशासकिय कार्यात उपयोगात आणण्यास सुरुवात झाली. ज्यामुळे माहिती,आकडे संग्रहन ,विश्लेषन, फाईल,रेकॉड संग्रहण ही कार्य प्रभाविपणे करता येऊ लागली.यासाठी संगणकाचा उपयोग होऊ लागला. स्वयंचलीत यंत्राच्या प्रयोगामुळे लेखांकन, सारणी, विश्लेषन,तात्काळ सुचना-माहिती आदान-प्रदान करणे शक्य झाले कार्य सुव्यवस्थित व सोप्या पध्दतीने करता येतात.

**कार्यअनुसंधान** -operation research

कार्यअनुसंधान म्हणजे गणितिय पध्दतीचा वापर करुन तसेच सर्व गोष्टीचा चिकित्सक व संशोधनात्मक दृष्टीने विचार करुन समस्या सोडवण्यासाठी निश्चीत निर्णय घेण्याचे साधन होय. यात समस्येचा सर्वांगीन बाजुने विचार केला जातो.समस्या सोडवण्यासाठी विविध तांत्रिक पध्दती व तंत्राचा

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

अवलंब केला जातो. संघ भावना कार्य करताना वाढिस लागते. बदलाचा अभ्यास करण्यासाठी गणक यंत्राचा वापर केला जातो. निर्णयासाठी या तंत्रामुळे अनेक मार्ग उपलब्ध होतात.

कार्य अनुसंधानाचा प्रथम उपयोग इंग्लंडमध्ये व्दितीय महायुध्दावेळी रडार पध्दतीचा उपयोग करताना झाला.कार्यात्मक अनंसंधानामुळे इंग्रंज वैमानिक प्रभावित झाले . त्यामुळे त्यांच्यात सांघिक कार्याची (team work ) भावना विकसित झाली. तसेचे प्रशासन/संघटनेच्या कार्यात सांघीक भावना विकसित करुन कार्य कार्यक्षमतेने पुर्ण करणे व संघटनेच्या प्रत्येक भाग/घटकात सुधारणा घडवुन आणण्यासाठी कार्य अनुसंसाधनाला प्राधान्य दिले. आधुनिक काळात प्रशासकिय सुधारणात कार्यात्मक अनुसंधान महत्वपुर्ण उपलब्धी मानली जाते.

वरील तंत्राचा अवलंब जगातील लहान-मोठे राष्ट्र प्रशासकिय सुधारणाच्या दृष्टीने प्रयत्न करतात. याच्या माध्यमातुन लोकसेवेची व्यापकता वाढवणे, दर्जा सुधारणे,सेवा व्यवहार्यपणे व कार्यक्षमतेने प्रदान करणे याला प्राधान्य दिले जाते. याच्या माध्यमातुन राष्ट्राचा सामाजिक - आर्थिक विकास घडवुन आणणे हा हेतु असतो.

**संदर्भसुची :**

१. होशियार, सिंह, (२००४ ) भारतीय प्रशासन,किताब महल,इलाहाबाद,पृ.क्र.४७९
२. अवस्थी/ माहेश्वरी (२०१२-१३) लोकप्रशासन, लक्ष्मीनारायण अग्रवाल आग्रा, पृ.क्र.५५५.
३. Lee, Hann-Been (१९७६) Bureaucratic models and Administrative Reforms .The Hague Martinus Nij hoff. P.११४
४. अवस्थी माहेश्वरी (२०१२-१३) लोकप्रशासन, पृ.क्र. ५६०-५६१
५. डॉ.शर्मा रश्मी, ( २०१६) लोकप्रशासन, SBPD Publication पृ. क्र. २२२.
६. Bidut Chakrabarthy, Prakash Chand ( २०१२), public Administration in Globalizing world, sage pub. New Delhi.